| MHLA150007202019 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | ३०/०७/२०१९ |
| | नोंदणी दिनांक | : | ३०/०७/२०१९ |
| | निकाल दिनांक | : | ३०/०३/२०२६ |
| | कालावधी | : | ०६व. ०८म. ००दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (I))

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी – व्ही.एस. वाघमोडे यांच्या समोर.) | |
| | **नियमीत फौजदारी खटला क्र.७०/२०१९**<br>नि.क्र. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकुर जि. लातूर | |
| सहा. सरकारी अभियोक्ता | | श्रीमती पी.एस. भराडीया |
| आरोपी | १. | तुकाराम धोंडीराम जाधव,<br>वय – ३६ वर्ष, धंदा – मजूरी, |
| | २. | प्रशांत मोहनराव किनीकर,<br>वय – २३ वर्ष, धंदा – मजूरी,<br>दोन्ही रा. बनसावरगाव ता. चाकूर जि. लातूर |
| आरोपीचे विधीज्ञ | | श्री. डी.जे. कापसे |

**भाग – ब**

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०३/०३/२०१९ |

| | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०३/०३/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | ३०/०७/२०१९ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | ०२/०२/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०२/०२/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ३०/०३/२०२६ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्माविण्याचा दिनांक | - - |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुकाराम धोंडीराम जाधव, | दि.०४.०३.२०१९ फौ.प्र.सं. कलम ४१-अ, ची नोटीस. | दि.०४.०३.२०१९ | भा दं वि कलम ३४१,३२४, ५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| २ | प्रशांत मोहनराव किनीकर, | दि.०४.०३.२०१९ फौ.प्र.सं. कलम ४१-अ, ची नोटीस. | दि.०४.०३.२०१९ | भा दं वि कलम ३४१,३२४, ५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (iii))

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

### -अभियोगपक्ष -

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | हाणमंत दिगांबर इटेवाड | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०२ | नामदेव परबतराव घंटेवाड | साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०३ | शंकर उर्फ प्रभू तुकाराम घंटेवाड | साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०४ | रुक्मीनबाई विक्रम बुधवाडे | साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०५ | विक्रम ज्ञानोबा बुधवाडे | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०६ | डॉ. श्रीकांत नामदेवराव शेळकीकर | वैद्यकीय अधिकारी |

ब– **–बचावपक्षाचे साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –– | – |

क– **–न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –– | – |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ– **–अभियोगपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | नि.क्र.३ | मुद्देमाल पावती |
| २ | नि.क्र.४ | प्रथम खबर अहवाल |
| ३ | नि.क्र.१९ व २० | साक्षीदार क्र. १ यांची सही |
| ४ | नि.क्र.५२ | पत्र |
| ५ | नि.क्र. ५३ | जखमेचे प्रमाणपत्र |

ब – **–बचावपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क –** **–न्यायालयाचे निशाणी क्रमांक –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड –** **न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| | -- | -- |

**इ.** **–भौतिक वस्तु–**

| अनु.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

**<u>– न्यायनिर्णय –</u>**

(पारीत दिनांक ३०.०३.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

२. आरोपी क्र. २ हा आरोपी क्र. १ यांचा भाचा आहे. दि. ०३.०३.२०१९ च्या आठ महिन्यापुर्वी फिर्यादी आकाश विक्रम बुधवाडे याने तुकाराम जाधव यास चोरीचे सोने दिल्याने त्या सोन्याचे पैसे रु. ३०,०००/- येणे होते. त्यांनी फिर्यादीला रु. १५,०००/- दिले व बाकी रु. १५,०००/- येणे होते.

३. दि.०३.०३.२०१९ रोजी १७.०० वा. फिर्यादी ॲटोमध्ये घरातील सामान घेवून भाटसांगवी येथे जात असतांना बनसावरगाव येथे आरोपी तुकाराम जाधव याने ॲटोला थांबवून फिर्यादीला खाली उतरवून, माझ नाव कशाला

घेतलास म्हणून व माझे पैसे मला दे, म्हणून दोन्ही आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ केली. आरोपी क्र. २ यांनी काठीने डोकीत, हातावर मारुन जखमी केले. पोटात, पाठीवर लाथा बुक्यांनी मारहाण करुन, तुला लय माजलास का म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी फिर्यादीची आई रुक्मीनबाई विक्रम बुधवाडे ही तेथे आली असता तीस पण शिवीगाळ करुन धमकी दिली. नामदेव घंटेवाड, ॲटो चालक शंकर घंटेवाड हे तेथे हजर होते. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरोधात पोलीस ठाणे चाकूर येथे तक्रार दिली.

४. प्रस्तुतच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे चाकूर येथे दि.०३.०३.२०१९ रोजी गु.र.क्रमांक ६१/२०१९ भा.दं.वि. कलम ३२४, ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. एम.एस. तुडमे, पो.हे.कॉ. पो.स्टे. चाकुर यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा केला व जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले आणि तपास पूर्ण झालेनंतर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. वरील गुन्हयास अनुसरुन पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भादवि कलम ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अंतर्गत दोषारोप नि.क्र.१४ नुसार ठेवून आरोपांचे स्वरुप समजावून सांगितले असता आरोपींनी त्यांच्यावरील आरोप नाकारुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली व त्याबाबतचे निवेदन नि.क्र.१२, १४ वर दाखल आहे. आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणेचे बयाण नि.क्र. ५९ व ६० नुसार नोंदविण्यात आले.

६. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | दि.०३.०३.२०१९ रोजी १७.०० वा. मौजे बनसावरगाव ता. चाकुर जि. लातूर येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला गैरपणे निरुध्द केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३४१ सह कलम ३४ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना ईच्छापुर्वक काठीने मारहाण करुन दुखापत केली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३२४ सह कलम ३४ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांना अपमानित केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०४ सह कलम ३४ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ४. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०४ सह कलम ३४ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दे क्र. १ ते ४ करीता</u>** –

७. चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दे क्र. १ ते ४ हे एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आलेले आहेत.

८. साक्षीदार क्र. १ हाणमंत दिगांबर इटेवाड यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि.०४.०३.२०१९ रोजी पोलीसांनी त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलाविले नव्हते. त्यातील मजकूर त्यांना माहीत नाही.

अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या सर्व सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली. त्यांनी हे नाकारले की, पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळाचा व एक वेळूची काठी जप्तीचा पंचनामा केला होता.

९. साक्षीदार क्र. २ नामदेव परबतराव घंटेवाड, साक्षीदार क्र. ३ शंकर उर्फ प्रभू तुकाराम घंटेवाड, साक्षीदार क्र. ४ रुक्मीनबाई विक्रम बुधवाडे आणि साक्षीदार क्र. ५ विक्रम ज्ञानोबा बुधवाडे यांच्या साक्षीत असे आले आहे की, घटनेबाबत त्यांना कांहीच माहीती नाही. घटना कधी, केंव्हा व कोठे झाली हे त्यांना माहीत नाही. अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या सर्व सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ, बरोबर नसल्याचे कथन केले.

१०. साक्षीदार क्र. ६ वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रिकांत नामदेवराव शेळकीकर यांनी त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. ०३.०३.२०१९ रोजी त्यांनी फिर्यादी जखमी आकाश विक्रम बुधवाडे यांना तपासले असता त्यांना त्यांच्या डोक्याच्या वर मध्यभागी कापीव जखम आढळून आली होती त्यामुळे त्यांनी जखमेचे प्रमाणपत्र नि.क्र. ५२ जारी केले. परंतू सदरच्या जखमा या आरोपींच्या मारहाणीमुळे झाले हे शाबीत होत नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास पुरक ठरत नाही. अभियोगपक्षातर्फे फिर्यादी यांना सदर प्रकरणामध्ये तपासण्यात आलेले नाही.

११. वरील सर्व चर्चेवरुन अभियोगपक्षाचे महत्वाचे साक्षीदार यांनी अभियोगपक्षाला सहकार्य न केल्याने आरोपींनी वर नमुद गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाला निःसंशयपणे शाबीत करता आली नाही, त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते. तसेच मुद्दा क्र.५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | आरोपी तुकाराम धोंडीराम जाधव, प्रशांत मोहनराव किनीकर यांना भारतीय दंड विधान कलम ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक वेळुची काठी, मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे. |
| ३. | आरोपीने पुर्वीच दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–ए च्या तरतुदी करीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे. |
| ४. | (सदरहू न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.03.30 17:23:31 +0530

दिनांक – ३०.०३.२०२६

(व्ही.एस. वाघमोडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | M. B. Pathan |
| Name of the Court | : | Civil Judge J.D. & J.M.F.C, Chakur. |
| Date of Order/ Judgment | : | 30/03/2026 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | : | 30/03/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 30/03/2026 |